जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ५७८ दिनांक -२६/०७/२०२३

पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

**भारती विद्यापीठ पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, अट्टल गुन्हेगारावर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये ३३ वी स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे **चंद्रकांत रामदास माने,वय-२१ वर्ष,रा.भेंडी चौक,हरणाई कॉम्पलेक्स बिल्डिंग मागे,आंबेगाव खुर्द,पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने त्याच्या साथीदारांसह सिंहगडरोड, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत लोखंडी कोयता यासारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,इच्छा पुर्वक जबर दुखापत करणे,गंभीर दुखापत,दंगा,बेकायदा हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचे विरूध्द ०३ गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासुन जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी नमुद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षा करीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.विजय कुंभार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणा�या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतरची एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेची ही ३३ वी कारवाई असून**,यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.